23/03/2020

सादरः-

**विषय :- कोरोना विषाणूप्रसारा वरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र, पुणे, पिंपरी चिंचवड आणि नागपूर शहर येथील आपल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थिती ठेवण्यावर निर्बंध आणणेबाबत चे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक 20 मार्च 2020 चे अंमलबजावणीबाबत सविनय सादर**

आदरणीय न्यायमूर्ती,

वर विषयासंदर्भात नमूद करतो की, महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणूचा प्रसार दररोज वाढत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने शासकीय कार्यालयात अधिकारी आणि कर्मचारी यांची उपस्थिती 25% ठेवण्यात यावी या बद्दल सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 20 मार्च 2020 रोजी शासन निर्णय जारी केलेला आहे.

टीव्हीवरील बातम्यांवरून दिनांक 22 मार्च2020 च्या मध्यरात्रीपासून 31 मार्च 2020 पर्यंत रेल्वेप्रशासनाने मुंबईतील लोकल रेल्वे सेवा बंद ठेवण्याचा आणि केवळ 5% अधिकारी/कर्मचारी यांनी हजर राहणे बद्दलचा निर्णय घेतला आहे, त्यामुळे मुंबई येथील राज्य ग्राहक आयोग व जिल्हा ग्राहक मंच या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयात हजर राहण्यात अडचण होणार आहे.

अशा परिस्थितीत सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यातील राज्य आयोग, परिक्रमा खंडपीठ, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांना लागू करावी किंवा नाही तसेच लोकल रेल्वे सेवा 31 मार्च2020 पर्यंत बंद असल्यामुळे महाराष्ट्र राज्यातील राज्य ग्राहक आयोग, परिक्रमा खंडपीठ आणि जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थिती बद्दल व न्यायिक कामकाजाबद्दल योग्य ते आदेश होणे गरजेचे असल्याने मान्यतेस्तव सविनय सादर

| | |
|---|---|
| 23/3/20 | 23/03/2020 |
| ( मु. पां. भावसार) | ( बा. द. पवार) |
| प्रबंधक प्रशासन | प्रबंधक विधी |

कोरोना व्हायरस प्रसार प्रतिबंधक उपायामुळे ट्रेन व बसेस बंद झाल्याने व दळणवळण ठप्प झाले. सर्व कर्मचाऱ्यांनी घरातून तातडीचे काम संगणक

मा. अध्यक्ष राज्य आयोग ( श्री. न्या भंगाळे सर )

किंवा भ्रमणध्वनीच्या माध्यमाने करून घेण्यास त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल पत्ते घेऊन त्यांचे मार्फत तातडीची कामे जशी गरज निर्माण होईल त्यानुसार दि. 31 मार्च 2020 पावेतो करून घ्यावीत. परिस्थितीनुसार काय बदल होतो ते बघून व शासकीय मार्गदर्शक सूचनानुसार पुढील निर्णय सर्व जिल्हा मंच तसेच राज्य आयोगाच्या कार्यालयांनी घ्यावेत असे कळवावे

23.03.2020